# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त,मिरा-भाईदर,वसई-विरार यांचे कार्यालय

सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन,मिरा-रोड(पुर्व),ठाणे.४०११०७

फोन नंबर-०२२-२९४५१००३.

**Email ID-pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट – क्र. ५३** दिनांक ०८/०३/२०२१

**पोलीस आयुक्तालय,मिरा-भाईदर,वसई-विरार येथे दि.०८.०३.२०२१ रोजी महिला दिनाचे औचित्य साधुन जागतिक महिला दिवस साजरा करण्यात आला.**

आज रोजी जागतिक महिलादिनाचे अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन मा. श्री.सदानंद दाते पोलीस आयुक्त,मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे मार्गदर्शनात करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे आयुक्त कार्यालय तसेच पोलीस ठाणे स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमादरम्यान महिला दिनाचे औचित्य साधुन एक मध्यवर्ती व पोलीस ठाणे स्तरावर १४ एकुण १५ अंतर्गत तक्रार समिती (विशाखा समिती स्थापन ) करण्यात आल्या आहेत.सदर विशाखा समितीचे कार्यप्रणालीबाबत मान्यवरांकडुन मार्गदर्शन करण्यात आले.तसेच उल्लेखनिय कामगिरी करणा-या महिला पोलीस अमंलदार यांचा मा.पोलीस आयुक्त सो.यांचे हस्ते गैरव करण्यात आला.

पोलीस आयुक्त कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन,आभार प्रदर्शन व समारोप मपोउपनिरी/संध्या पवार यांनी केले. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ.अश्विनी पाटील,सहा.पोलीस आयुक्त,नेम.आगुशा यांनी केले.सदर प्रस्तावने दरम्यान अंतर्गत तक्रार समिती (विशाखा समिती स्थापन ) रचना व कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

मा.पोलीस आयुक्त सो.यांनी केलेल्या मोलाचे मार्गदर्शनात महिलांनी त्यांचे कौशल्याचा पुर्ण क्षमतेने वापर करावा असा संदेश दिला.

सदर कार्यक्रमाकरिता एकुण ३५ महिला अधिकारी,महिला अंमलदार व महिला मंत्रालयीन कर्मचारी उपस्थित होत्या.पोलीस आयुक्तालय कार्यालयातील हा कार्यक्रम मा.पोलीस आयुक्त,मा.अपर पोलीस आयुक्त,पोलीस उप आयुक्त(गुन्हे), पोलीस उप आयुक्त(मुख्यालय) यांचे उपस्थित पार पडला.

Scanned with CamScanner